UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2009**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose one question from Section 1, one from Section 2 and one other.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should write between 500 and 600 words for each answer.
Set texts may **not** be taken into the examination room.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
All questions in this paper carry equal marks.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.
टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर,
डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारीत असावा. विभाग 1 मधून **एक** प्रश्न,
विभाग 2 मधून **एक** प्रश्न व उरलेला **एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
प्रस्तावना, संदर्भ, टीपा व अर्थाचे स्पष्टीकरण असलेले पाठ्यपुस्तक परीक्षेच्या खोलीत नेता येणार नाही.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.
सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

SP (SM/TL) T72274/1
© UCLES 2009

UNIVERSITY *of* CAMBRIDGE
International Examinations

**[Turn over**

www.xtremepapers.net

## विभाग-1

**1 संत ज्ञानेश्वर -सार्थ ज्ञानेश्वरी - अध्याय 2 रा.**

**(ओवी क्रमांक १८ ते २२)**

सांडीं हें मूर्खपण । उठीं घे धनुष्यबाण ।
संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ॥
हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां ।
सांगें झुंजावेळें सदयता । उचित कायी ॥
हे असतिये कीर्तीसी नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु ।
म्हणे जगन्निवासु । अर्जुनातें ॥
म्हणोनि शोकु न करीं । तूं पुरता धीरु धरीं ।
हे शोच्यता अव्हेरीं । पंडुकुमरा ॥
तुज नव्हे हें उचित । येणें नासेल जोडलें बहुत ।
तूं अझुनिवरीहित । विचारी पां ॥

**(अ)** **(i)** अर्जुनाचे वागणे मूर्खपणाचे आहे असे श्रीकृष्णाला का वाटले ?

**(ii)** अर्जुनाने कोणता युक्तिवाद केला ?

**(iii)** श्रीकृष्ण व अर्जून यांच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाका. [25]

**अथवा**

**(ब)** श्रीकृष्ण व अर्जुन यापैकी कोणाचा युक्तीवाद अधिक प्रासंगिक व संयुक्तिक वाटतो ? सविस्तर चर्चा करा. [25]

© UCLES 2009


www.xtremepapers.net

**2 संत तुकाराम-सार्थ श्री तुकारामाची गाथा.**

**(अभंग क्र.२६८०, २६८१ व २६८२)**

जैसा तैसा आतां । मज प्रमाण अनंता ॥
पायां पडणें न सोडीं । पोटी तेंच वर तोंडी ॥
एका भावें चाड । आदीं तेंची अंती गोड ॥
तुका म्हणे आम्हां । टळणेंचि नाहीं नेमा ॥

चुकलों या ऐशा वर्मा । तरी कर्मा सांपडलों ॥
पाठी लागे करी नास । गर्थवास भोगवी ॥
माझें तुझें भिन्न भावें । गळां दावें मोहाचें ॥
तुका म्हणे पाठेळ केलों । नसत्या भ्यालों छंदासी ॥

देह प्रारब्धाने शिरीं । असोन करी उद्वेग ॥
धांव घालीं नारायणा । माझ्या मना जागवीं ॥
ऐसीं चुकोनियां वर्मे । पीडा भ्रमें पावलों ॥
तुका म्हणे कैंचा भोग । नव्हे रोग अंगींचा ॥

**(अ)** **(i)** तुकारामाने कोणता नेम केला व का ? स्पष्ट करा.

**(ii)** कर्माच्या पेचात पडल्यामुळे तुकारामावर कोणती संकटे कोसळलीत ? सविस्तरपणे विशद करा.

**(iii)** वरील उद्धृत अभंगांतून तुकारामाच्या मनातील संघर्षावर प्रकाश टाका. [25]

**अथवा**

**(ब)** तुम्ही अभ्यासिलेल्या तुकारामाच्या अभंगांतून त्याने कोणकोणत्या ढोंगी चाली-रीतींवर व समजुतीवर प्रहार केला, ते विस्ताराने विशद करा. [25]



www.xtremepapers.net

**3 गोविंदाग्रज - फणसाचे पान - कविता - फणसाचे पान.**

सहजचि दिसते पायाखाली मज फणसाचे पान
सवेच कवनाचे हृदयीच्या चढत चालते मान
फणसाच्या त्या पानावरती दिसल्या ज्या मज रेषा
कधी काळच्या उघडुनि दाविति मनिच्या आन्तररेषा.

लिहुनि ठेविली पूर्ववयामधि कधी गोड जी पानी
पुन्हा वाचिली; आणि जाहला सखेद हर्षेहि रमणि !
दोनच नयनी नीट दिसेना, अंधुक जग हे अवघे
प्रीतीच्या उपनेत्रावाचुनि – पुढे बोलणे नलगे.

डोळे झाकुनि भरभर फिरुनी कथा वाचिली मग ती
हतभागी हे जीव जगी या स्मरणे केवळ जगती
गाव कुणाचे – नाव कुणाचे – आणि कुणाचे पान
सरोवराला परका मधुकर करित रसाचे पान.

वाऱ्यासरशी अंगावरती येऊनि पडती पाने
नेमधर्म त्या कसला ? अथवा नेम देव तो जाणे
सुंदर चित्रा ! मदपूर्णा ती कथा तुझी आठवते
बाले ! रमणि ! प्रणयभराने हृदय किती खळखळते.

सळसळती ही आजहि, सखये, भवती हिरवी राने
'गोविंदाग्रज' परी शोधितो ती फणशीची पाने.

**(अ)** **(i)** फणसाचे पान पाहून कवीच्या मनात कोणते भाव जागृत झाले ?

**(ii)** 'भवती हिरवी राने' या उक्तीतील भावार्थ स्पष्ट करा.

**(iii)** या कवीतेतील कल्पनांचे व भावनांचे सौंदर्य विशद करा. [25]

**अथवा**

**(ब)** '' 'जीवितास' या कवितेतून जीवनाविषयीचे कडू अनुभव व वैफल्यातून उद्‌भवलेले तत्त्वसार आले आहे.''
प्रस्तुत विधानाच्या संदर्भात सविस्तर चर्चा करा. [25]

© UCLES 2009


www.xtremepapers.net

## विभाग-2

**4 अशोक पाटोळे-नाटक-आई रिटायर होतेय.**

(अ) 'आई रिटायर होतेय' या नाटकातील संघर्ष दोन पिढ्यातील अंतरामुळे उद्‌भवला की आईच्या स्वाभिमानी स्वभावातून उद्‌भवला ? चर्चा करा. [25]

**अथवा**

(ब) प्रस्तुत नाटकातील संवाद लेखन कौशल्यावर साधक बाधक चर्चा करा. [25]

**5 आशा बगे - कथासंग्रह - मारवा.**

(अ) 'वर्तुळ' कथेतून लेखिकेने माणसा-माणसातील परस्पर संबंध हे फक्त स्वार्थावर उभारलेले असतात हे नीला व दिवाकर यांच्याद्वारे कसे उलगडून दाखविले आहेत हे साधार विशद करा. [25]

**अथवा**

(ब) 'नाकारता येत नाही. तोडणं जमत नाही. फक्त सहन करत जावं लागतं. असं हे विचित्र आयुष्य !' असं 'नातं' या कथेतील नीनाला का वाटतं ? [25]

**6 हरी नारायण आपटे – कांदबरी - गड आला पण सिंह गेला.**

(अ) 'ऐतिहासिक कादंबरी लिहिताना ऐतिहासिक काळातील वातावरण निर्मितीला फार महत्त्व असते' प्रस्तुत विधानाच्या संदर्भात 'गड आला पण सिंह गेला' या कादंबरीचे परीक्षण करा. [25]

**अथवा**

(ब) शिवाजी महाराजांचे व्यक्तिचित्रण करा. [25]



www.xtremepapers.net

**BLANK PAGE**



www.xtremepapers.net

**BLANK PAGE**



www.xtremepapers.net

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.



www.xtremepapers.net